NKP Salve Inst. of M. Sciences
Copy Received
Inward No. 3122
Date 8/8/09
Despatcher Sign.

एन.के.पी. साळवे इन्स्टिटयुट ऑफ मेडीकल सायन्सेस ॲण्ड लता मंगेशकर हॉस्पीटल, नागपूर येथील एम.बी.बी.एस. अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ करण्यास परवानगी....

महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग,
शासन निर्णय क्रमांक : एनयुआर - १००६/प्र.क्र.२०/०६/शिक्षण-२
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक:- २१ जुलै, २००९

वाचा:- १) कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे पत्र क्र. मआविवि/पीबी/पीजी/९८०/२००५, दिनांक २९.१२.२००५ व क्र. मआविवि/पीबी/पीजी/ /२००५, दिनांक निरंक, जानेवारी २००६.
२) केंद्र शासनाच्या आरोग्य व कुंटुंब कल्याण मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.एफ.क्र.यु.-१२०१२/३३२/२००६-एमई (पी-२), दि. १२.०६.२००९

<u>प्रस्तावना</u>:- एन.के.पी. साळवे इन्स्टिटयुट ऑफ मेडीकल सायन्सेस ॲण्ड लता मंगेशकर हॉस्पीटल, नागपूर या महाविद्यालयातील एम.बी.बी.एस. अभ्यासक्रमाची विद्यार्थी प्रवेश क्षमता १०० वरुन १५० पर्यन्त वाढविण्याच्या प्रस्ताव महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे उपरोक्त संदर्भ क्रमांक (१) अन्वये शासनास प्राप्त झाला आहे. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचेकडून प्राप्त प्रस्तावानुषंगाने शासनाने संस्थेस दिनांक ३० जानेवारी २००६ रोजी आवश्यकता प्रमाणपत्र दिले आहे. केंद्र शासनाने उपरोक्त संदर्भ क्रमांक (२) च्या पत्रानुसार सदर अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता सन २००९-१० पासून १०० वरुन १५० इतकी वाढविण्यास परवानगी दिलेली आहे. हे विचारात घेता शासन पुढील प्रमाणे निर्णय घेत आहे.

<u>शासन निर्णय</u>:- एन.के.पी. साळवे इन्स्टिटयुट ऑफ मेडीकल सायन्सेस ॲण्ड लता मंगेशकर हॉस्पीटल, नागपूर या महाविद्यालयातील एम.बी.बी.एस. अभ्यासक्रमाची विद्यार्थी प्रवेश क्षमता सन २००९-१० या शैक्षणिक वर्षी १०० वरुन १५० पर्यन्त वाढविण्यास खालील अटींच्या अधीन राहून शासन याव्दारे मंजुरी देत आहे:-

१) एम.बी.बी.एस. अभ्यासक्रमाच्या वाढीव जागांकरीता महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे संलग्निकरण संस्थेने प्राप्त करुन घ्यावे व संलग्निकरण प्राप्त झाल्यानंतरच त्या जागांवरील प्रवेश करण्यात यावेत.

UG Cell

२) राज्य शासन/केंद्र शासन/मा. सर्वोच्च न्यायालय अथवा मा. उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार सदर अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरीता, फी ठरविण्याकरीता कार्यपध्दत अवलंबविण्यात यावी.

३) केंद्र शासन अथवा राज्य शासनाकडून वेळोवेळी विहित करण्यात येतील अशा सर्व नियमांचे/आदेशांचे पालन करणे बंधनकारक राहील

२. सदर आदेश महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ मधील कलम ६४(५) खालील परंतुकानुसार शासनास प्रदत्त असलेल्या अधिकाराचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(बि.लां. ढोले)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.उप मुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई
प्राचार्य, एन.के.पी. साळवे इन्स्टिटयुट ऑफ मेडीकल सायन्सेस ॲण्ड लता मंगेशकर हॉस्पीटल, दिग्डोह हील, हिंगणा रोड, नागपूर
ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ, ग्रंथालय, विधानभवन, मुंबई
मा.मंत्री (वै.शि.) यांचे स्वीय सहायक
मा.राज्यमंत्री (वै.शि.) यांचे स्वीय सहायक
अवर सचिव (शिक्षण-१) वैद्यकीय शिक्षण व औषधि द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
निवडनस्ती (शिक्षण-२)